# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२६४००६३/६५
०२२ – २२७१ ७५००
फॅक्स – ०२२ २२६४२६५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


जा.क्र.राआसो/महिला आरोग्य अभियान/ /१५
दिनांकः-२३ फेब्रुवारी, २०१५

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय, सर्व जिल्हे
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व जिल्हे.

**विषयः- दि.२६/०२/२०१५ ते दि.१२/०३/२०१५ दरम्यान महिला आरोग्य अभियान राबविणेबाबत.**

संदर्भः- १) संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/संचा.कक्ष/महिला आरोग्य अभियान/१९०८-२००४/२०१५ दि.०९/०२/२०१५.
२) आयुक्त (कु.क.) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/महिला आरोग्य अभियान/१३९८०३-९२६/१५ दि.२१/०२/२०१५.

उपरोक्त विषयी संदर्भ पत्र क्र.२ नुसार दि.२६/०२/२०१५ ते १२/०३/२०१५ या पंधरवाड्यात महिला आरोग्य अभियान राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर मार्गदर्शक सुचनांच्या मुद्दा क्र.१, ३, ४, ८ व ९ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

१) **दि.२६/०२/२०१५ (अ)** प्रत्येक आरोग्य संस्थेत महिला आरोग्य अभियानाचे उद्घाटन आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री/संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य/महानगरपालिका महापौर/नगरपरिषद अध्यक्ष/जिल्हा परिषद अध्यक्ष/आरोग्य समिती सभापती/महिला लोक प्रतिनिधी अथवा आपल्या संस्थेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांचे हस्ते करण्यात यावे.

**ब)** अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण), पुणे यांचे मार्गदर्शनाखाली कौशल्य व वात्सल्य कार्यक्रमाचे व मानसिक आरोग्य हेल्पलाईनचे उद्घाटन आणि पुणे जिल्ह्यातील क्षयरोग रुग्णांकरिता आरोग्यवर्धिनी कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात यावे.

**क)** सदर अभियानाच्या कालावधीत विविध माध्यमांद्वारे आयोजित उपक्रमांबाबत जनजागृती करण्याची जबाबदारी उपसंचालक आय.ई.सी. आरोग्य सेवा यांची राहिल.

**ड)** सदर अभियानाचा प्रचार आपल्या गावातील/शहरातील स्थानिक केबल, स्थानिक वृत्तपत्रात बातमी देऊन जास्तीत जास्त जनजागृती होईल याबाबत तालुका आरोग्य अधिकारी/जिल्हा प्रसिध्दी व माध्यम अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

३) **दि.२६/०२/२०१५ ते दि.१२/०३/२०१५** सदर कालावधीमध्ये १००% गरोदर मातांची तसेच प्रसुतीनंतरच्या (PNC) तपासणीकरिता मातांची नोंदणी व रक्तक्षयाच्या तपासणी करिता शिबिरे आयोजित करावी. तसेच सर्व वयोगटातील महिलांची रक्तक्षयाबाबत तपासणी करावी. माता बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत जनजागृती तसेच उपलब्ध माहिती अद्ययावत करणे, अपेक्षित प्रसुती दिनांकाबाबत पाठपुरावा करणे तसेच दवाखान्यातील प्रसुतीकरिता गरोदर महिलांचे प्रबोधन करावे. HACC अंतर्गत उपलब्ध सेवा १०२, १०४ व १०८ याबाबत जनजागृती करावी.

४) **दि.०३/०३/२०१५ ते दि.०६/०३/२०१५** **अ)** या कालावधीत ३० वर्षापेक्षा जास्त वयोगटाच्या महिलांचे उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग (गर्भाशय, स्तनाचा, मौखिक व इतर) याकरिता तपासणी शिबिरे

आयोजित करावी. राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमातील मार्गदर्शक सुचनांनुसार मौखिक आरोग्याकरिता शिबिर आयोजित करावे. या शिबिरांकरिता कान, नाक, घसा चिकित्सक व ज्या ग्रामीण/उपजिल्हा/जिल्हा रुग्णालय येथे दंतचिकित्सेची खुर्ची उपलब्ध आहे तेथे दंत चिकित्सक यांची व्यवस्था करण्यात यावी. कान, नाक, घसा चिकित्सक व कर्करोग चिकित्सक यांनी मौखिक कर्करोगाची तपासणी करावी. आपल्या जिल्हयातील IMA व NIMA संघटना यांचेशी सलग्न डॉक्टरांचा देखील सहभाग या अभियानात करावा. तसेच डोळयांची निगा व काळजी याबाबत तपासणी शिबिरे आयोजित करावी.

**ब)** या अभियानाकरिता आपल्या जिल्हयातील शिबिराच्या ठिकाणी बाहेरगावावरुन येणा-या डॉक्टर्स व त्यांच्या संघटना यांचेकरिता वाहन सेवा/निवास व्यवस्था व प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पॅकेट लंचची सोय करण्यात यावी.

८) **दि.१/०३/२०१५ ते दि.१२/०३/२०१५ अ)** कायापालट कार्यक्रमांतर्गत बाहय रुग्ण विभागात संगणकीय टोकन सेवाप्रणाली चे उदघाटन करावे. तसेच आपल्या कार्यालयातील सर्व यंत्रसामुग्री अद्यायावत/दुरुस्ती करावी. बायोमॅट्रीक हजेरी मशिन सुरु करावी. यंत्र सामुग्रीचे सॉफ्टवेअर अद्यायावत करावे. नवीन व जुन्या यंत्रसामुग्रीची माहिती अद्यायावत ठेवावी. तसेच नवीन यंत्राचे/कक्षाचे उदघाटन करावे. नादुरुस्त यंत्रे व फर्निचर यांची यादी करुन योग्य पध्दतीने सदर सामुग्री निर्लेखित करुन विल्हेवाट लावावी.

**ब)** आपल्या जिल्हयातील सर्व आरोग्य संस्थांची दुरुस्ती, रंगरंगोटी, माहिती फलक लावणे, अशी कामे CSR प्रकल्पांतर्गत करावी. त्याचबरोबर वृक्ष लागवड व आरोग्य संस्थेत LED बल्ब चा वापर करावा.

९) **दि.२६/०२/२०१५ ते दि.१२/०३/२०१५** या कालावधीत उपसंचालक (परिवहन), आरोग्य सेवा, पुणे यांनी बंद वाहनांची दुरुस्ती करुन सर्व वाहने सुस्थितीत राहतील याची दक्षता घ्यावी. रुग्ण वाहिकेतील बायोमॅट्रीक मशिन दुरुस्त करुन १००% कार्यान्वित करावी.

या अभियानाकरिता अनुदानाची आवश्यकता भासल्यास यापूर्वी कळविल्याप्रमाणे RKS किंवा Untide Fund मधील उपलब्ध अनुदानातून राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विहीत पध्दतीने खर्च करण्यात यावा. प्रत्येक जिल्हयाने सदर अभियानाचा विस्तृत अहवाल, छायाचित्रांसह त्याची हार्ड (Hard) व सॉफ्ट (Soft) कॉपी मध्ये तयार करावा. सदर अभियानात सहभागी असलेल्या खाजगी डॉक्टर्स/स्वयंसेवक व स्वयंसेवी संस्था यांना संबंधित जिल्हयाच्या जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सहभागाबाबत प्रशस्तीपत्र प्रदान करावे. (प्रशस्तीपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.)

यापैकी प्रत्येक कार्यक्रमा विषयक सविस्तर मार्गदर्शक सुचना व अहवाल प्रपत्रे सोबत जोडली आहेत. तसेच सदर कार्यक्रमाची माहिती दिलेल्या नमून्यामध्ये भरुन mahila.arogya.abhiyan@gmail.com या ई-मेलवर दररोज दुपारी ३.०० वाजेपर्यंत पोहचेल अशा त-हेने निर्गमित करावी.

आयुक्त (कु.क.) व संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान,
मुंबई.

संचालक आरोग्य सेवा,
आरोग्य सेवा संचालनालय,
मुंबई.

**प्रत माहितीस्तव:-**

१) अतिरीक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण, पुणे
२) अतिरीक्त संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३) सहसंचालक, (रुग्णालये), आरोग्य सेवा, मुंबई

४) अधीक्षक अभियंता, (पासुविक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५) सहसंचालक, (लेखा व वित्त), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
६) सहसंचालक, (तां), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७) सहसंचालक, (अत्ता), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
८) सहसंचालक, (निविमु), आरोग्य सेवा, मुंबई
९) सहसंचालक, (राअंनिका), आरोग्य सेवा, मुंबई
१०) सहसंचालक, (असंसर्गजन्य रोग ), आरोग्य सेवा, मुंबई
११) उपसंचालक, (आमाजीआ), आरोग्य सेवा, पुणे
१२) उपसंचालक, (आयईसी), आरोग्य सेवा, पुणे
१३) उपसंचालक, (परिवहन), आरोग्य सेवा, पुणे
१४) उपसंचालक, आरोग्य सेवा (परिमंडळे, सर्व)
१५) सहायक संचालक, (राज्य रक्त संक्रमण), आरोग्य सेवा, मुंबई
१६) सहायक संचालक, (आयुष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१७) प्रकल्प संचालक, (ईएमएस), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१८) वरिष्ठ सल्लागार, (पीपीपी), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१९) वरिष्ठ सल्लागार, (प्रशिक्षण), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२०) राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२१) राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, मुंबई
२२) सल्लागार, (आयपीएचएस) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२३) सल्लागार/कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई